MHGO060000752024

**म. कौ. हिं. का.अर्ज क्र– ०२/२०२४**
अर्पिता वि. अंकुश व इतर

**आदेश नि. क्र. ५ खाली**
**(आदेश पारीत दिनांक १६.०४.२०२५)**

अर्जदाराने सदरचा अर्ज अंतरिम पोटगी मिळण्याकरीता दाखल केला आहे.

२) अर्जदाराने अर्जात असे कथन केले आहे की, अर्जदार हिचे गैरअर्जदार नं. १ सोबत दिनांक २६.०२.२०२३ रोजी मौजा निर्मल नगरी नंदनवन नागपूर येथे साक्षगंध गैरअर्जदार क्र. १ च्या आग्रहामुळे पार पडला. सदर साक्षगंधाला गैरअर्जदार नं. १ च्या आग्रहाचा मान ठेवून अर्जदाराच्या वडीलांना अंदाजे ३,००,०००/– रुपये खर्च आला. अर्जदार हिचे गैरअर्जदार नं. १ सोबत दिनांक १२ मे २०२३ रोजी प्रसन्न सभागृह अर्जुनी/मोरगांव येथे जाती रिवाजानुसाार विवाह संपन्न झाला. अर्जदाराचे लग्न झाल्यानंतर अर्जदार ही गैरअर्जदार क्र. १ च्या घरी मौजा चंद्रपुर येथे संपुर्ण आंदन, स्त्रीधन व लग्नामध्ये हातात पडलेले सर्व पैसे व ब्युटी पार्लरचा सर्व सामानासह नांदण्यास गेली. गैरअर्जदाराकडे नांदण्यास गेल्यावर सुहागरातच्या दिवशी रुममध्ये दोघेच असतांना गैरअर्जदार क्र. १ ने अर्जदाराला असे म्हटले की, रुममधील पलंग माझे बहीणीने स्वतःच्या पैशाने सजविला असल्यामुळे मी तुझ्यासोबत झोपत आहे. तुझ्यासोबत झोपतांना मला कुठलीही ईच्छा नाही. जिच्यासाठी हा पलंग बनविला तीच आज हया पलंगावर नाही.

३) अर्जदाराने पुढे असेही कथन केले आहे की, त्यानंतर लग्नाच्या ४ ते ५ दिवसांनी गैरअर्जदार नं. १, ४, ५ त्यांच्या पती व त्यांच्या मुलांसह चंद्रपुर जवळच्या रिसॉर्टवर फिरायला गेले. त्यावेळी गैरअर्जदार नं. १ व गैरअर्जदार क्र. ४ व ५ चे पती

यांनी खुपच दारु पिवून अर्जदारासोबत खुप मोठा वाद घालून तिला जास्त शहाणी बनू नको, तुझ्या नवेगांवच्या बनकर परीवाराची ऐसी तैशी करुन म्हणून सर्वजण एकत्र होवून तिला दोषी ठरवून धमकावित होते. तसेच एक दिवशी गैरअर्जदार क्र. ३ ही अर्जदाराला म्हणाली की, गैरअर्जदार क्र. २ हे भंडारा येथे लग्नाला रात्रीच्या ट्रॅव्हलने जाणार आहेत तेव्हा त्यांच्यासोबत तु लग्नाला निघून जा, तेव्हा तिला एकाच साडीवर कोणतेही कपडेलत्ते व दागिने न घेता गैरअर्जदार क्र. २ सोबत जाण्यास भाग पाडले. तसेच गैरअर्जदाराने अर्जदाराला अशी धमकी दिली की आमचे सर्व पोलिस बांधले आहेत, जर का तुझे डोक्यात विचार येत असेल तर तु आमची काही रिपोर्ट देवू शकत नाही असे म्हणून ती रात्री रडत रडत भंडारा येथे लग्नाला तिच्या सास-यासोबत गेली. सदर लग्नाला अर्जदाराचा सर्व परीवार उपस्थित असतांना ती सर्वांना भेटली. सदर घटना ही २२ जुन २०२३ ची असून ती २३ जुन २०२३ ला भंडारा येथे तिच्या माहेरच्या परीवाराला भेटल्यावर झालेले सर्व प्रकरण तिने तिच्या माहेरच्या लोकांना सांगितले.

४) अर्जदाराने पुढे असेही कथन केले आहे की, तिचे आई बाबा २४ जुन २०२३ ला स्वागत समारंभासाठी चंद्रपुरला आले. सदर स्वागत समारंभामध्ये तिचे सासरे व तिचे पती तिच्या आई बाबाला म्हणाले की दोन्ही परीवार बसुन मिटींग घ्यायची आहे. ठरल्याप्रमाणे सासर व तिच्या माहेरच्या लोकांची बैठक सुरु असतांना गैरअर्जदार क्र. १ अर्जदाराला म्हणत होता की, कडक शब्दात मुद्दे मांडशील, आम्हांला सर्वांना ऐकायला मजा आली पाहीजे. गैरअर्जदार क्र. १ ला गैरअर्जदार क्र. ४ व ५ चे फोन नेहमी येतात व तिची विचारपुस करुन तिला लहान लहान गोष्टीवरुन टोमणे मारतात. सदर मिटींगमध्ये अर्जदाराने रिसॉर्टवर झालेला प्रकरण सांगितला. पहील्या रात्रीच्या वेळी घडलेला प्रकरण सुध्दा सांगितला. तसेच तिने सांगितले की, गैरअर्जदार क्र. १ हा दारु पितो, त्याच्या ऑफीस बॅगमध्ये सेक्स संबंधी खुपच गोळया असतात. दहेजमध्ये तुला तुझे आईने काहीही दिले नाही, गैरअर्जदार क्र. १

रोज तिला म्हणतो, खूप काळी दिसत आहेस, कधी म्हणतो चांगली दिसत नाहीस, डोमळी तुला तर छातीच नाही, तुझ्यात मला रसच नाही, तु आमच्या घरच्या सर्वांच्या नजरेतुन उतरली आहेस, बाहेर गेल्यावर माझी प्रेमीका मी तुला दाखवीन, कीती सुंदर आहे, गोरी व हेल्दी आहे, तुझ्यासोबत लग्न करुन फसलो, तुझेपेक्षा चांगली मुलगी मिळू शकते.

५) अर्जदाराने पुढे असेही कथन केले आहे की, त्यानंतर तिच्या आई वडीलांनी तिला चंद्रपुर येथे सासरी नेवून दिले. एक ते दोन दिवसानंतर पुन्हा भांडणास सुरुवात झाली. गैरअर्जदार क्र. १ चे दोन मोबाईल तिच्या रुममध्ये तिला सापडले. त्या मोबाईलमधील संपूर्ण डाटा तिने तिच्या मोबाईलमध्ये घेतला. मुलीसोबत हॉटेलमध्ये नेवून झोपण्याचे फोटो व काही मुलींना पैशाने नेवून झोपवलेले फोटो व काही मुलींना दोन हजार व काही मुलींना पाच हजार रुपये दिल्याचे मेसेज दिसले. तिच्या पतीसोबत त्यांच्या आफीसमध्ये असलेली संगिता नावाच्या मुलीसोबत दारु पितांनी ते फोटो व बाहेर फिरायला नेण्याचे मॅसेज दिसल्यावर तिने तिचे सासु सासरे व ननंद यांना हया सर्व फोनमधील प्रकरण दाखविले. तेव्हा ते सर्वजण आमचा मुलगा असा आहे हे माहीती नव्हते पण हया सर्व गोष्टी तुझे माहेरी सांगु नको.

६) अर्जदाराने पुढे असेही कथन केले आहे की, तसेच काही दिवसांनी तिचे पती आफीसला गेल्यावर तिचे सासरे तिला म्हणत होते की, तुझी कंबर बारीक आहे, तु खुप नाजुक आहेस, त्यावेळी तिची पाळी आल्याने तिच्या पोटात खुप त्रास होत होता हे सांगितल्यावर कुठे दुखते ते मी बघतो तिला हात लावले. गैरअर्जदार क्र. ४ व ५ हे गैरअर्जदार क्र. १ ला म्हणत होते की, तु एक नंबरची बदमास बायको मिळाली. ती गरोदर आहे म्हणून तिचेवर दबाव आणून डॉक्टरकडे तपासणीसाठी नेले. त्यामुळे ती गरोदर नाही असे बोलल्यावर सुध्दा त्यांनी तिचा शारीरीक, मानसिक त्रास देवून तिला राखीला सुध्दा जाण्यास मज्ञाव केला. त्यामुळे ती एकटी

पडल्याने आयुष्याला कंटाळून संडासात जावून हारपिक प्राशन केला. दुस–या दिवशी तिचे आई बाबा, मावशी व काका तिला भेटायला आले. तीन दिवस ती आय सी यु मध्ये दवाखान्यात होते. त्यावेळी तिच्या सास–यांनी तिला येवून सांगून गेले की, पोलिस तुझा बयाण घेतील तर टेंशनमुळे हारपीक पिलो असेच बयाण तिने दिले. दिनांक २९.०८.२०२३ रोजी प्रकृती ठिक नसल्यामुळे माहेरी जात आहे म्हणून एका कागदावर अर्पिता अंकुश दानव स्वतःच्या जबाबदारीने घटना घडली असून माझे पती व सासरच्या लोकांनी डॉ. कुबेर यांच्या दवाखान्यात भरती करुन स्वतःच्या ईच्छेने जहर खाल्ले असून जहरची बाटल उचलली व खाल्लली असे लिहून त्यावर तिची जोरजबरदस्तीने सही घेतली. सदर घरामध्ये अर्जदार एकटी पाडल्यामुळे ती माहेरी येण्यासाठी निघाली. तेव्हा तिचे सासरे यांनी बॅगमध्ये काय नेत आहेस म्हणून तिची संपूर्ण बॅग तपासली व सासुने एक गळयातला मंगळसुत्र दिले व ती घरातून माहेरी येण्यासाठी निघाली.

७) अर्जदाराने पुढे असेही कथन केले आहे की, तिचे पती हे महेंद्रा कंपनीमध्ये मॅनेजर या पदावर कार्यरत आहेत. त्यांना महीन्यापोटी दोन लाख रुपये पगार आहे. तिचे सासरे हे कोलमाईन्स येथे माठया पदावर कार्यरत होते. त्यांना भरपुर पेंशन मिळते. ती आज रोजी सुध्दा मानसिक त्रासातून बरी झालेली नाही. ती स्वतःचा उदरनिर्वाह करण्यास असमर्थ असून गैरअर्जदार नं. १ वर तिच्याशिवाय कोणाच्याही पालनपोषणाची जबाबदारी नाही. गैरअर्जदाराने आजपर्यंत अर्जदाराला कोणतीही आर्थिक मदत केली नसल्यामुळे, अर्जदाराने रु. ३०,०००/– दरमहा अंतरीम पोटगीची रक्कमेची मागणी केलेली आहे.

८) गैरअर्जदाराने त्याचे उत्तर निशाणी क्र.२० वर दाखल केले आहे. गैरअर्जदार क्र. १ च्या म्हणण्यानुसार अर्जदार हिचे वडील सुरेश बनकर व आई हे दोघेही पेशाने शिक्षक व मुख्याध्यापक आहेत. ती लग्नाअगोदर ब्युटी पार्लरचा पाच वर्षापासून स्वतंत्र व्यवसाय करीत होती. तिला रु. १,५०,०००/– वार्षिक मिळकत

होती व ती स्वतः काम करुन व व्यवसाय करुन स्वतःच्या पायावर उभी होती हा एकच मोठा इगो तिला होता. गैरअर्जदाराकडे आई वडील, अर्जदार व गैरअर्जदार असे चार लोक राहु लागले. परंतु अर्जदार हिला तिच्या वडीलाच्या घरी उशिरा उठायची सवय असल्यामुळे ती त्या पध्दतीने वागु लागली. त्यानंतर काही दिवसाने गैरअर्जदार हा अर्जदाराला घेवून मित्रा व त्यांच्या परीवारासोबत महाबळेश्वर येथे फिरायला गेले. सदर टुर हा अर्जदाराचा वाढदिवस साजरा करण्याचा मुख्य हेतू होता. महाबळेश्वरे येथे रिसॉर्ट वर अर्जदाराचा वाढदिवस सेलीब्रेशन केल्यानंतर जेवण करतेवेळी अर्जदार ही भसाभसा खाउ लागली. अर्जदार ही भसाभसा जेवण करुन रुममध्ये जावून झोपून गेली. गैरअर्जदार हा रुममध्ये झोपण्यासाठी गेला असता दार उघडत नव्हती, सर्वजण तिला आवाज देउ देउ परेशान झाले. परंतु तिने सकाळपर्यंत दार उघडला नाही. अर्जदाराला सदर बाब तिच्यावरच उलटले म्हणून तिने परीक्षेचा कारण सांगून माहेरी जाण्याची तयारी केली व मला माहेरी सोडून दया म्हणून सांगितले. परंतु तिने सांगितलेल्या दिवशी वेळेवरच सुट्टी मिळू शकत नाही आपण उद्या जावू असे म्हटल्यावर तु मला सोडून देत नाही तर मी मरतो व तुला माझा वध केल्याच्यया गुन्हयामध्ये फसवतो, म्हणून अर्जदार ही बाथरुममध्ये जावून तिने बाथरुमधील हार्पिक पिण्याचे नाटके केले व बेहोश होण्याचे नाटक केले व सर्वांचे लक्ष वेधून घेवून माहेरी जाण्यासाठी सोंग केले.

९) गैरअर्जदाराने पुढे असेही कथन केले आहे की, अर्जदाराने आपले आई वडीलाला गैरअर्जदाराविषयी खोटेनाटे सांगून रिपोर्ट देण्यास भाग पाडले. परंतु सदर रिपोर्ट चंद्रपुरला न देता नवेगांवबांध येथे दिली. परंतु नवेगांवबांध पोलिसांनी सदर मामला भरोसा सेल गोंदिया येथे पाठविले परंतु त्या ठिकाणी सुध्दा अर्जदाराने नांदण्याची ईच्छा दर्शविली नाही त्यामुळे मामला पुन्हा पोलिसांकडे वर्ग करण्यात आला. अर्जदार ही जवळ जवळ तीन महीने गैरअर्जदाराजवळ नांदली. या तीन महीन्यात तिने खुशीने चांगल्याप्रकारे गैरअर्जदाराला वैवाहीक संबंध सुध्दा प्रस्थापित

करु दिले नाही व मनायची की मला तुझ्या बाळाची बाई व्हायची नाही व झाली तर होणारे बाळ हे मनोरुग्न झाल्याशिवाय राहणार नाही.

१०) गैरअर्जदाराने पुढे असेही कथन केले आहे की, गैरअर्जदार हा प्रायव्हेट कंपनीमध्ये तोडक्या पगारात कामाला आहे. त्यामळे एवढया तोडक्या पगारात तिचे भागु शकत नाही व तिचे आई वडील हे महीन्याला दोघा मिळून दोन लाख रुपये कमवितात. त्यामुळे गैरअर्जदाराचा पगार हा तिला पुरेसा नाही. करिता, गैरअर्जदाराने सदर अर्ज खारीज करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

११) अर्जदार व गैरअर्जदार यांच्या विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अर्ज व अभिलेखावरील कागदपत्रांवरुन खालील मुद्दे उपस्थीत झालेले आहेत. सदर मुद्दे व त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसहित खालील प्रमाणे नमुद करण्यात येत आहे.

| अनु.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार ही गैरअर्जदारांनी तिच्यावर कौटुंबिक हिंसाचार केल्याचे प्रथमदर्शनी सिध्द करते काय ? | होय. |
| २. | अर्जदार ही अंतरीम पोटगी मिळण्यास पात्र आहेत का ? असल्यास किती ? | होय, गैरअर्जदार क्र. १ कडुन अर्जदार ही रक्कम रुपये ५०००/- प्रतीमहा अंतरीम पोटगी म्हणुन मिळण्यास पात्र आहे. |
| ३. | काय आदेश? | अर्ज अंशतः मंजुर करण्यात येत आहे. |

**कारणमिमांसा**

**मुद्दा क्र. १ करीता**

१२) अर्जदार ही गैरअर्जदार क्र. १ ची पत्नी आहे. अर्जदार हीने अर्जात असे कथन केले आहे की, गैरअर्जदार हे तिला नेहमीच त्रास देत असतो. तसेच गैरअर्जदार क्र. १ हा अर्जदाराला असे नेहमी म्हणत होता की, दहेजमध्ये तुला तुझे आईने काहीही दिले नाही, तु खूप काळी दिसत आहेस, चांगली दिसत नाहीस,

डोमळी तुला तर छातीच नाही, तुझ्यात मला रसच नाही, तुझ्यासोबत लग्न करुन फसलो. तसेच गैरअर्जदार क्र. १ हा दारु पिऊन अर्जदारासोबत भांडण करीत होता. अर्जदार व गैरअर्जदार यांच्यामधील नातेसंबंध लक्षात घेता त्यांच्यामध्ये 'कौटुंबिक नातेसंबंध' असल्याचे दिसते. अभिलेखावरुन अर्जदार क्र. १ कलम २ (अ) प्रमाणे 'पिडीत महीला' असल्याचे दिसते. तसेच गैरअर्जदाराने अर्जदाराला मानसिक व शारिरीक त्रास देवून कौटुंबिक हिंसाचार केल्याचे प्रथमदर्शनी दिसत आहे. म्हणून मी मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र. २ करीता</u>**

१३) अर्जदाराच्या कथनानुसार ती तिचे वडिलांकडे राहत आहे. तिच्याकडे उदरनिर्वाहाचे कोणतेही साधन नाही. गैरअर्जदार क्र. १ हा महेंद्रा कंपनीमध्ये मॅनेजर या पदावर कार्यरत आहेत. त्यांना महीन्यापोटी दोन लाख रुपये पगार आहे. गैरअर्जदाराने आजपर्यंत अर्जदाराला कोणतीही आर्थिक मदत केली नसल्यामुळे, अर्जदाराने रु. ३०,०००/- दरमहा अंतरीम पोटगीची रक्कमेची मागणी केलेली आहे. याउलट गैरअर्जदाराने असे कथन केले आहे की, तो प्रायव्हेट कंपनीमध्ये तोडक्या पगारात कामाला आहे व आपल्या आई-वडीलांची देखरेख करत आहे. त्यामुळे गैरअर्जदार अर्जदाराला अंतिम पोटगी देवू शकत नाही. त्याने त्याचे कथन सिध्द करण्यासाठी त्याची फेब्रुवारी २०२४ ची पगाराची पावती लावलेली आहे. तसेच त्याने कथन केले आहे की, अर्जदार ही ब्युटी पार्लरचा व्यवसाय करते व तिला त्यापासून चांगले उत्पन्न मिळते.

१४) वरील चर्चेनुसार असे निष्पन्न होते की, गैरअर्जदार क्र. १ ने अर्जदाराकडे दुर्लक्ष केले आहे. अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ वेगळे राहत आहे. अर्जदार ही स्वतःचा उदरनिर्वाह करण्यास असमर्थ आहे. गैरअर्जदाराने अर्जदाराच्या उत्पन्नाबाबत कोणताही दस्ताऐवज दाखल केला नाही. गैरअर्जदार क्र. १ वर पती

म्हणून अर्जदार हीला सांभाळण्याची कायदेशीर तसेच नैतीक जबाबदारी आहे. परंतु अर्जदार माहेरी गेल्यापासून गैरअर्जदाराने अर्जदाराच्या उदरनिर्वाहाची कोणतीही तरतुद केलेली नाही. याठिकाणी हे नमुद करणे आवश्यक आहे की, गैरअर्जदार क्र. १ ला त्याच्या माहे फेब्रुवारी २०२४ च्या पगार पावतीनुसार महीन्याचे २४,९१८/– रुपये इतकी रक्कम मिळते. म्हणून माझ्या मते गैरअर्जदार क्र. १ ची अर्जदाराच्या उदरनिर्वाहाची रककम पुरविण्याची ऐपत आहे व अर्जदार ही उदरनिर्वाह खर्च मिळण्यास पात्र आहेत. म्हणून मी गैरअर्जदाराची आर्थिक परिस्थिती, सद्ययाची महागाई, अर्जदाराची सामाजिक व राहती परिस्थिती, दैनंदिन खर्चाकरीता अर्जदाराला लागणारा खर्च या सर्व बाबी लक्षात घेता अर्जदार हिला रु. ५०००/– प्रतिमाह अंतरिम पोटगी मंजुर करणे उचीत व न्यायोचीत ठरेल. वरील सर्व बाबींचा विचार करता मी मुद्दा क्र. २ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्र. ३ करीता**

१५) अर्जदाराने तिचे हक्क प्रथमदर्शनी सिध्द केले आहे. अर्जदाराची आर्थिक परिस्थिती लक्षात घेता खालील अंतरिम आदेश पारीत करणे संयुक्तीक ठरते. मुद्दा क्र. ३ च्या उत्तराप्रित्यर्थ मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१] अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२] गैरअर्जदार क्र. १ यास आदेशीत करण्यात येते की, अर्जदाराला अंतरीम पोटगी रु.५०००/– प्रतिमहा सदर अर्ज दाखल केल्याच्या दिनांकापासून ते मुळ अर्जाच्या निकालापर्यंत देण्यात यावी.

३] सदर आदेशाची प्रत दोन्ही पक्षांना विनाशुल्क देण्यात यावी.

NEHA VIJAY SHAHU

Digitally signed by NEHA VIJAY SHAHU
Date: 2025.04.16 13:05:01 +0530

(एन. व्ही. साहू)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी
अर्जुनी/मोरगांव

दि. १६.०४.२०२५